प्रेस नोट

**आंतरराज्य घरफोडी, जबरी चोरी, व दुहेरी हत्याकांडमध्ये सामील असलेला पाहिजे आरोपी जेरबंद**

वानवडी पोलीस स्टेशनचे डी.बी.चे पथकास एक इसमास स्मशानभुमी परिसर, रामटेकडी येथे धारदार लोखंडी कोयता जवळ बाळगुन फिरत आहे. अशी खबर मिळताच लागलीच मिळालेल्या बातमीप्रमाणे स्मशानभुमी जवळ,रामटेकडी,हडपसर,पुणे येथे जावून एक इसम हातात लोखंडी कोयता बाळगुन फिरत होता. त्यास पकडले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव पत्ता **सागरसिंग सुरजसिंग ऊर्फ फंटयासिंग अंधरेले बाबरी** वय-२० वर्षे, रा.भिमनगर,आंबेडकर पुतळ्याजवळ,जालना सध्या रा.समर्थनगर नवीन म्हाडा कॉलनी श्रीमती जीतकौर कर्तारसिंग भोंड यांचे घरात,हडपसर,पुणे असे सांगीतले. त्याप्रमाणे त्यावर वानवडी पोलीस स्टेशन गु.र.नं. ५२८/२०१७ कलम महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ३७(१)१३५ सह आर्म ॲक्ट कलम ४(२५) प्रमाणे गुन्हा दाखल केला.

**सदर आरोपीस अटक केल्यानंतर त्यांचेकडे विचारपुस करता व त्याचे गुन्हेगारी रेकॉर्ड चेक केले असता त्यामध्ये-**

१) चाळीसगाव पोलीस ठाणे(जि.जळगाव) गु.र.नं.२४/२०१७ भा.दं.वि.क. ४६०,४५९,३४ **(दुहेरी खुन प्रकरण)**प्रमाणे दाखल असलेल्या गंभीर गुन्हयात सहा महिन्यांपासुन **पाहिजे** आरोपी आहे.

२) पिठलम पोलीस ठाणे (जि.कामारेडी, राज्य तेलंगणा)गु.र.नं. १३२/२०१७ भा.दं.वि.क.३९२,३४ प्रमाणे **(28,85,000/- ची जबरी चोरी)** दाखल असलेल्या गंभीर गुन्हयातील **पाहिजे** आरोपी आहे.

३) सदर आरोपीवर जालना जिल्यात अनेक घरफोडीचे गुन्हे दाखल असून त्यास जालना जिल्हयातून तडीपार करण्यात आलेला आहे.

४) सदर आरोपीने वानवडी पोलीस ठाणे गु.र.नं.४०८/२०१७,भादंवि ४५४,३८० हा गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्यास सदर गुन्हयात वर्ग करुन तपास करुन त्यात याचेकडून गुन्हयातील मुद्येमाल (सोन्याचे दागिने)जप्त केलेले आहेत.

सदर गुन्हयाचा तपास श्री.दिपक साकोरे,सो.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ ४,पुणे शहर, श्री.निलेश मोरे,सो.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग, श्री.सयाजी गवारे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वानवडी पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली वानवडी पोलीस स्टेशन तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक श्री.अजय म्हेत्रे, व त्यांचे कर्मचारी पो.हवा.भोसले, पो.ना.युवराज दुधाळ, सुदर्शन बोरावके, ज्ञानेश्वर गिरमकर, निसार खान, पो.शि.शिरीष गोसावी,कानिफनाथ कारखेले,कैलास मारकर,प्रतिक लाहीगुडे, नासीर देशमुख,योगेश गायकवाड यांनी करुन गुन्हा उघडकीस आणला आहे.